# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहीर सूचना

विषय - कोंडवाडा विभागातील श्रमिकांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर स्वयंसेवी संस्थांमार्फत भरण्याबाबत कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहीर सूचना

---

सदर सूचनेव्दारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, बृहन्मुंबईतील रस्त्यावर फिरणारी भटकी मोकाट जनावरे पकडण्याची कारवाई करणेकामी खालील अटीनुसार कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकीय (एन.जी.ओ.) कोंडवाडा अधिकारी, गुरांचा कोंडवाडा कार्यालय, गाळा नं.७, श्री वासुदेव बिल्डिंग, तळमजला, मामलेदार वाडी, रोड नंबर २, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४ यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र, असलेल्या संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसहित दि. ३१.०३.२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सीलबंद अर्ज कोंडवाडा कार्यालय, गाळा नं.७, श्री वासुदेव बिल्डिंग, तळमजला, मामलेदार वाडी, रोड नंबर २, मालाड (प),मुंबई - ४०००६४ येथे सीलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) संस्थांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामांसाठी फक्त स्थानिक पी/उत्तर विभागातील अशासकीय संस्थांनी (धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत संस्था) अर्ज करावेत.

२. कार्यादेश दिल्यानंतरच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.

३. प्रतिदिन प्रती कामगार ६७९.२३/- इतके वेतन + अधिदान परिपत्रक क्र.प्रकाअ ६४ दि.३०.०४.२०११ च्या अटीच्या पूर्ततेनंतर ( प्रतीपूर्ती स्वरुपात ) करण्यात येईल.

४. कोंडवाडा विभागातील अधिका-यांच्या सूचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केल्याप्रमाणे(सकाळ/दुपार/रात्र) सुरळीतपणे विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे, सदर अटीचा भंग झाल्यास प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. पुरवठा केलेल्या कामगारांच्या देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परीक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक २२०८००४०० या लेखाशीर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस./एन.ई.एफ.टी.व्दारे अधिदान केले जाईल.

६. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आरटीजीएस / एन.ई.एफ.टी.व्दारे करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास संस्थेचे काम रद्द करुन संस्था काळ्या यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आरटीजीएस/एन.ई.एफ.टी.व्दारे अधिदान मिळाले नसले तरीही कामगारांना विहित अधिदान करणे बंधनकारक आहे, अन्यथा प्रपत्र 'ब' प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

७. बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्याची संपूर्णत: कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहील.

८. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

९. सदर कामांसाठी इच्छुक अशासकीय संस्था वस्तू व सेवाकर अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

१०. उपरोक्त अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरीत्या काम न करणा-या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांच्याकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरित थांबविण्याचे अधिकार कोंडवाडा अधिकारी यांना राहतील.

११. अशासकीय संस्था(एन.जी.ओ.)यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन लॉटरी पध्दतीने पात्र अशासकीय संस्थेची निवड करण्यात येईल. उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरीची तारीख – ०४.०४.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

कोंडवाडा अधिकारी,
कोंडवाडाकार्यालय,मालाड(प)

पीआरओ / / एडीव्ही/२१-२२

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कोंडवाडा कार्यालय, मालाड (प)

स्वारस्याची अभिव्यक्ती सूचना

महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी खालील दिलेल्या कामाकरिता कोंडवाडा विभागाच्या कार्यक्षेत्रातील कार्यरत असलेल्या इच्छुक नोंदणीकृत बेरोजगार संस्था, स्थानिक मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था, विहित अटी व शर्तीवर स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्याचे ठरविलेले आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदा शुल्क | स्वारस्याची अभिव्यक्तीकरिता आवश्यक अर्हता | नियत दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | कोंडवाडा विभाग, मालाड (प) यांच्या अखत्यारीत अशासकीय बेरोजगार व बहुउद्येशिय संस्थेच्या कामगारांची सहा महिन्यांच्या कालावधीकरिता, आवश्यकतेनुसार नियुक्ती करणेबाबत. | रु.१३००/- अधिक ५% GST | १) संस्था बृहन्मुंबई महापालिकेची नोंदणीकृत वेंडर असणे आवश्यक आहे.<br>२) संस्था कोंडवाडा विभागाच्या कार्यक्षेत्रातील असणे आवश्यक आहे.<br>३) हया अशासकीय संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.<br>४) या स्थानिक संस्था किमान ६ महिने कार्यरत असणे, तसेच त्यांनी यापुर्वी कामे केल्याचा अनुभव / कार्यादेश सादर करणे.<br>५) स्वारस्याची अभिव्यक्ती अर्जासोबत अटी व शर्ती नुसार आवश्यक असलेली कागदपत्रे साक्षांकित करून सादर करणे आवश्यक आहे.<br>६) स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी पात्र असणा-या संस्थांमधून ०२ संस्थांना सोडत पध्दतीने सदर काम समानतेच्या तत्वावर कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरिता, तसेच प्रतिक्षा यादीवर दोन संस्थांची निवड करण्यात येईल. | ३१.०३.२०२२ |

वर उल्लेख केल्याप्रमाणे स्वारस्याची अभिव्यक्ती अर्जाच्या प्रतीचे शुल्क रु.१३००/-अधिक ५ टक्के GST महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्र येथे भरल्यानंतर कोंडवाडा अधिकारी, कोंडवाडा कार्यालय, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४ या ठिकाणी नियत दिनांकाच्या एक दिवस अगोदर दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सोमवार ते शुक्रवार कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत स.११.०० ते दु.०१.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. अभिव्यक्ती अर्जाच्या प्रतीचे शुल्क भरुन त्याची पावती अभिव्यक्ती अर्जाची प्रत घेण्यासाठी सोबत सादर करावी. सदर शुल्काची रक्कम फक्त डी.डी. किंवा रोख रक्कमेद्वारे स्विकारण्यात येईल. धेक स्विकारण्यात येणार नाहीत.

स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज भरुन व शिक्क्यानिशी स्वाक्षांकित करुन लखोट्टयामध्ये (पाकीटात) सील बंद करावा व लखोटयावर कोंडवाडा अधिकारी, गुरांचा कोंडवाडा कार्यालय, २री मामलेतदार वाडी, श्री वासुदेव बिल्डिंग, तळमजला, रुम नं.७, मालाड (प), मुंबई - ४०००६४ असे नमूद करुन यांचे कार्यालयात नियत दिनांका दिवशी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी कार्यालयात सादर करावेत.

कोंडवाडा अधिकारी
कोंडवाडा कार्यालय मालाड (प)

बृहन्मुंबई महानगरपालिका
कोंडवाडा कार्यालय, मालाड (प)

हमीपत्र

(५००/- रुपये स्टॅम्प पेपरवर सादर करावे.)

मी, श्री./श्रीमती ------------------------------------------ या संस्थेचा पदाधिकारी म्हणून -------------------- या पदावर दि.--------------- पासून कार्यरत असून संस्थेच्या नियमांप्रमाणे माझी सदर पदावर रितसर नियुक्ती झाली आहे. संस्थेचा नोंदणी क्रमांक --------------- दि. ------------- असा आहे. संस्थेच्या नियमानुसार/ठरावानुसार मला संस्थेच्या वतीने सदर हमीपत्र देण्याचा अधिकार असून त्यानुसार मी खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

१) मुंबई महानगरपालिकेच्या कोंडवाडा कार्यालय, मालाड (प) यांच्या आस्थापनेवर अशासकीय संस्थेच्या कामगारांची व बहुउद्देशिय संस्थेच्या कामगारांची कंत्राटी तत्वावर कार्यादेश मिळाल्याच्या दिनांकापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार, नियुक्ती करणेबाबतचे आमच्या संस्थेला मिळण्यासाठी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेअंतर्गत अर्ज केला असून अर्जात नमूद सर्व तपशील माझ्या माहितीनुसार योग्य व खरा आहे.

२) मी शपथपूर्व जाहीर करतो की आमच्या संस्थेचा उद्देश हा संस्थेच्या सभासदांना रोजगार मिळवून देणे हा असून माझ्या संस्थेस कार्यादेश मिळाल्यास आम्ही योजनेच्या नियमानुसार काम करण्याची तसेच संबंधित सर्व कामगार कायदयाचे पालन करण्याची हमी याव्दारे देत आहे.

३) आमच्या संस्थेवर या पुर्वी कोणतीही प्रतिबंधात्मक / दंडात्मक कारवाई झालेली नाही तसेच संस्थेला काळ्या यादीत देखील टाकण्यात आलेले नाही. याबाबतची हमी याद्वारे देत आहे.

४) आम्हांला मिळालेला कार्यादेश संपूर्ण अथवा विभागून अन्य संस्था किंवा कंत्राटदारास देणार नाही.

५) अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबी मी वाचल्या आहेत व त्या मला समजल्या आहेत.

परिशिष्टातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. मी असे जाहीर करतो/करते की अर्जात दिलेली माहिती माझ्या विश्वासानुसार सत्य व योग्य असून ती असत्य असल्याचे दिसून आल्यास मी कायदेशीर कारवाईला पात्र असेन. तसेच संस्थेला मिळालेले काम/कार्यादेश त्यामुळे रद्द होऊ शकतो हे मला मान्य आहे.

स्वाक्षरी - --------------------
नाव - ----------------------
पदनाम - ---------------------
पत्ता - ----------------------
दिनांक - -------------------

## अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

१. संस्थेची नोंदणी धर्मदाय आयुक्त अथवा सहकार आयुक्त यांच्या दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

२. संस्थेची उपविधी/घटना याची प्रत.

३. संस्थेचे आर्थिक व्यवहार असलेले बँकेचे नांव खाते क्र. असलेल्या बँकेच्या खातेपुस्तिकेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

४. पात्र अर्जदार संस्थानी हमी पत्र (रु.५००/-किंमतीच्या मुद्रांकित स्टॅम्प पेपरवर) देणे आवश्यक असेल.

५. बृहन्मुंबई महानगरपालिका /इतर शासकीय /निमशासकीय /इतर संस्थेमध्ये मनुष्यबळ पुरविण्याचे काम केल्या संबंधीचा प्राप्त झालेल्या कार्यादेश /अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६. वस्तू व सेवा कर (GST) अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
(आवश्यक /लागू असल्यास)

७. अर्जदार संस्थेने त्यांच्या संस्था/सोसायटी/सहकारी संस्था नावाचे पॅन कार्ड सादर करणे आवश्यक आहे.

८. अर्जदार संस्था भविष्य निर्वाह निधी कार्यालयात नोंदणीकृत असल्यास तसेच त्या संस्थेत काम करणारे सभासद देखील भविष्य निर्वाह निधी व राज्य विमा योजने नुसार सभासद झाले असल्यास त्याबाबतची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कोंडवाडा कार्यालय, मालाड (प)

## सुचनेच्या अर्जाचा नमुना

परिशिष्ट

प्रति,

कोंडवाडा अधिकारी,

गुरांचा कोंडवाडा कार्यालय,

श्री वासुदेव बिल्डिंग, तळमजला, रुम नं. ७,

२री मामलेतदार वाडी, मालाड (प),

मुंबई - ४०० ०६४.

विषय - कोंडवाडा कार्यालय, मालाड (प) यांच्या अखत्यारीत अशासकीय संस्थेच्या कामगारांची व बहुउद्देशिय संस्थेच्या कामगारांची कंत्राटी तत्वावर, कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरिता, आवश्यकतेनुसार नियुक्ती करणेबाबत.

-----------

महोदय,

आमची संस्था संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेअंतर्गत कोंडवाडा कार्यालय, मालाड (प) येथे मनुष्यबळ पुरवू इच्छिते. तरी आम्हाला कृपया संधी मिळावी. संस्थेने आतापर्यंत केलेल्या कामाची माहिती पुढीलप्रमाणे.

अ) प्रशासकीय माहिती - ---------------------------------------

१) संस्थेचे नांव - --------------------------------------------

२) नोंदणी क्र. - ------------------------------------------

३) पत्ता - -----------------------------------------------

४) संस्थेचे बँक खाते असलेल्या बँकेचे नांव - --------------------खाते क्र.---------

५) संस्थेचे पॅन कार्ड नं - ---------------------------------------

६) वेन्डर रजि.नं. - ---------------------------------------

७) संस्थेचे संपर्क दुरध्वनी क्र. निवास -------------- कार्यालय -------
भ्रमणध्वनी ---------------- फॅक्स -------------- ई-मेल आयडी ---------

८) संस्था पदाधिकारी माहिती

| संस्था पदाधिकारी | संपूर्ण नांव | निवासी पत्ता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | | | | |
| सचिव | | | | |
| खजिनदार | | | | |

(वास्तव्याचा पुरावा/कागदपत्रे जसे की, रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळख पत्र, पॅन कार्ड, सरकारी/निमसरकारी यंत्रणेने दिलेली ओळखपत्रे कोणतेही दोन)

ब) कोंडवाडा विभाग, मालाड येथील कामाचा पुर्वीचा अनुभव/कार्यादेश -

क) अन्य माहिती - संस्था सध्या म.न.पा.च्या इतर उपक्रमात सहभागी आहे काय ? त्याचा तपशील, कार्यादेश, कामाचे स्थळ, कामाचा अवधी व त्यासंबंधीची माहिती.
(खोटी माहिती दिल्यास किंवा माहिती लपविल्यास संस्था कारवाईस पात्र राहिल)

| कामाचा तपशील | कार्यादेश | कामाचे स्थळ | कामाचा अवधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

महापालिकेच्या कोणत्याही कामामध्ये झालेल्या दंडात्मक कारवाईची माहिती -
(संस्थेचे पदाधिकारी व संस्था यांवर पूर्वी कारवाई झाली असल्यास त्याचा तपशील इ.)
-------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------
-------------

(असल्यास सर्व साक्षांकित कागदपत्रे सोबत सादर करावीत.)

संस्था किंवा संस्थेच्या पदाधिका-यांवर काही फौजदारी कार्यवाही झालेली असल्यास अथवा सुरु असल्यास त्याची माहिती पुढीलप्रमाणे.
-------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------
------

आम्ही संस्थेचे पदाधिकारी म्हणून वर नमूद केलेली माहिती सत्य असुन त्यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास किंवा चुकीची माहिती दिल्यास आमची संस्था महापालिकेच्या कायदेशीर कारवाईस पात्र असेल, तसेच मनुष्यबळ पुरविण्याअंतर्गत म.न.पा.च्या नियम व अटी प्रमाणे तसेच विहित केलेल्या राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या किमान वेतन दराप्रमाणे योजनेचे काम करण्यास आम्ही बांधिल असुन, त्यामध्ये आमची संस्था भविष्यात कोणतीही तक्रार किंवा सबबी सांगुन कामात दुर्लक्ष अथवा निष्काळजीपणा करणार नाही, याची आम्ही संस्थेमार्फत हमी देत आहोत.

| पदाधिकारी | संपूर्ण नाव व निवासी पत्ता व संपर्क क्र. | छायाचित्रे अध्यक्षाचे | स्वाक्षरी | संस्थेचा शिक्का |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

अध्यक्ष खजिनदार सचिव

बृहन्मुंबई महानगरपालिका
कोंडवाडा कार्यालय, मालाड (प)

## परिशिष्ट

## कामाचे साहित्य

| विभागाचे नांव | व्याप्ती / परिक्षेत्र | कोंडवाडा विभाग, मालाड (प) |
|---|---|---|
| कोंडवाडा विभाग | अर्जदार संस्थेने मनुष्यबळासोबत पुरवावयाची आवश्यक उपकरणे | |
| | सुरक्षा साधने | १) शूज, २) गणवेश ३) छत्री ४)रेनकोट<br>५) हातमोजे ६) साबण, ७) हेल्मेट ८) मास्क ९) टॉवेल इ. |